साप्ताहिक
# तेरणा वृत्तांत

धाराशिव | सोमवार, १३ जुलै २०२६ | अंक - २ | RNI NO. MHMAR/25/A0338 | वर्ष - २ | पाने ४ | किंमत ५ रुपये

# कर्जमुक्ती योजनेतील ५० हजार रुपयांची अट काढली, २ लाखांपर्यंत कर्ज माफ : मुख्यमंत्री



**मुंबई : राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देणारी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' ही ऐतिहासिक योजना असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना त्यांनी महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत ५० हजार रुपयांचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर योजनेमध्ये ५० हजार रुपयांचा लाभ देण्याची मर्यादा काढून टाकण्यात आली आहे, अशा शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे, अशी घोषणा केली. तसेच नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२६-२७ मध्ये कर्जाची उचल करून वेळेत परतफेड करण्याची अट रद्द करण्याची देखील घोषणा केली आहे.**

## 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने' तून ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटींचा लाभ

त्याचबरोबर कायदा व सुव्यवस्था, सायबर गुन्ह्यांवरील नियंत्रण, अमली पदार्थांविरोधातील कारवाई, पोलीस आधुनिकीकरण, जलसंपदा, कृषी आणि विविध विकासकामांबाबत शासनाने केलेल्या उपाययोजनांची माहिती सभागृहात दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राष्ट्रीयकृत, व्यापारी, खासगी आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडील माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ मिळणार आहे. पूर्वीच्या योजनेत दोन लाख रुपयांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता. मात्र, नव्या योजनेत दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असली तरी दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिली जाणार आहे.

महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील पात्र शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीसाठी असलेली ५० हजार रुपयांची मर्यादा आणि २०२६-२७ मधील नियमित परतफेडीची अट रद्द करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यावर अतिरिक्त आर्थिक



भार पडणार असला तरी कोणताही पात्र शेतकरी वंचित राहू नये, ही शासनाची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कृषी क्षेत्रासाठी राज्य शासन दरवर्षी सुमारे ९५ हजार कोटी रुपयांचा खर्च करीत असल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांच्या वीजबिलासाठी २५ हजार कोटी रुपये खर्च केले जातात. कापसाची १३६ लाख क्विंटल खरेदी करून १० हजार ८८३ कोटी रुपयांचे चुकारे अदा करण्यात आले आहेत. सोयाबीनचे ६ लाख टन उत्पादन ३ हजार १९८ कोटी रुपयांना खरेदी करण्यात आले, तर कांदा खरेदीमुळे बाजारभाव स्थिर राहण्यास मदत झाली आहे. ठिबक सिंचनासाठी प्रलंबित २१७ कोटी रुपये लवकरच वितरित करण्यात येतील, तसेच कृषी समृद्धी योजनेतील उर्वरित निधी पुरवणी मागण्यांतून उपलब्ध करून दिला जाईल, असे त्यांनी सांगितले.

राज्यात कुठेही नियोजित भारनियमन नसल्याचे स्पष्ट करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, यंदा ३२ हजार मेगावॅटपर्यंतची वीज मागणी पूर्ण करण्यात आली आहे. ७६ टक्के कृषी फिडरवर दिवसा वीजपुरवठा सुरू असून उर्वरित भागातही काम सुरू आहे. स्मार्ट मीटरबाबत प्राप्त झालेल्या बहुतांश तक्रारी तपासणीत चुकीच्या आढळल्या असून वाढीव वीजबिलांचा संबंध स्मार्ट मीटरशी नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.


### गुन्हे सिद्धतेच्या प्रमाणात वाढ

कायदा व सुव्यवस्थेबाबत माहिती देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राष्ट्रीय गुन्हेगारी आकडेवारीनुसार महाराष्ट्राचा प्रति एक लाख लोकसंख्येमागील गुन्हेगारी दराच्या बाबतीत देशात सातवा क्रमांक आहे. मे २०२५ ते मे २०२६ या कालावधीत दुखापत, जबरी चोरी, घरफोडी आणि चोरीच्या गुन्ह्यांत घट झाली असून गुन्हे उघडकीस येण्याचे प्रमाण ८२ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. गुन्हे सिद्धतेचा दर ४४.२ टक्क्यांवरून ५२.६ टक्क्यांपर्यंत वाढला असून तो ७० टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे.

# धाराशिव शहराच्या विकासाला नवी गती!

**धाराशिव : शहराच्या पायाभूत सुविधांच्या विकासाला मोठी चालना देणारा महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ (एमएसआयडीसी) यांनी घेतला आहे. भातांब्रा-धाराशिव-सारोळा-शिवली-बोरफळ रस्ता सुधारणा प्रकल्पाच्या सुधारित आराखड्यास मंजुरी मिळाल्याने धाराशिव ते सारोळा चौपदरीकरण, आरसीसी बंदिस्त गटारे, पदपथ आणि स्मार्ट स्ट्रीटसह विविध विकासकामांचा मार्ग मोकळा झाला आहे, अशी माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.**






मंजूर आराखड्यानुसार जिजाऊ चौक ते सांजा चौकच्या पुढे सुमारे ९९० मीटरपर्यंत चारपदरी रस्ता विकसित करण्यात येणार असून, त्यानंतर आणखी १.६७ किलोमीटरपर्यंत चौपदरीकरण केले जाणार आहे. तसेच सांजा गावात ६०० मीटर आणि सारोळा गावात ७५० मीटर अतिरिक्त चौपदरीकरणाचा समावेश करण्यात आला आहे.

पावसाळ्यात शहरात निर्माण होणाऱ्या पाणी साचण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून जिजाऊ चौक ते सांजा चौकदरम्यान ४.२४४ किलोमीटर लांबीची आरसीसी बंदिस्त गटारे व पदपथ उभारण्यात येणार आहेत. यामुळे पाणी निचऱ्याची व्यवस्था सुधारण्याबरोबरच पादचाऱ्यांना सुरक्षित सुविधा उपलब्ध होणार आहेत.

याशिवाय एमएसईबी उपकेंद्र ते सांजा चौक या मार्गावर ३६० मीटर लांबीची स्मार्ट स्ट्रीट विकसित करण्यात येणार असून, या परिसराचे आधुनिक पद्धतीने सुशोभीकरण केले जाणार आहे. आवश्यक त्या ठिकाणी सेवा वाहिन्यांचे स्थलांतर, पाइप कल्व्हर्टचे रुंदीकरण तसेच अन्य पूरक कामांचाही सुधारित आराखड्यात समावेश करण्यात आला आहे. एमएसआयडीसीने मंजूर केलेल्या सुधारित आराखड्यानुसार सुमारे ४५.६८ कोटी रुपयांच्या अतिरिक्त विकासकामांचा समावेश करण्यात आला असून, काही पूर्वनियोजित कामांमध्ये आवश्यक बदल करून संपूर्ण प्रकल्प आर्थिकदृष्ट्या संतुलित ठेवण्यात आला आहे.

या प्रकल्पामुळे धाराशिव शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होणार असून, वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत मिळेल. तसेच पाणी निचरा, सुरक्षित पदपथ आणि आधुनिक नागरी सुविधा उपलब्ध होऊन शहराच्या नियोजनबद्ध विकासाला नवी गती मिळेल, असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

# विधानपरिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांनी घेतले श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन

**तुळजापूर :** महाराष्ट्र विधानपरिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांनी रविवारी (दि. १२ जुलै) सहकुटुंब श्रीक्षेत्र तुळजापूर येथे येऊन श्री तुळजाभवानी मातेचे विधिवत दर्शन घेतले. यावेळी त्यांनी श्री तुळजाभवानी देवीची आरती करून देवीचे आशीर्वाद घेतले तसेच राज्यातील जनतेच्या सुख-समृद्धी, शांतता व सर्वांगीण विकासासाठी प्रार्थना केली.

यावेळी उपविभागीय अधिकारी, धाराशिव तथा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे विश्वस्त ओंकार देशमुख तसेच तुळजापूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष तथा तुळजाभवानी मंदिर संस्थानचे विश्वस्त विनोद गंगणे यांनी सचिन अहिर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व श्रीदेवीजींची प्रतिमा, महावस्त्र देऊन यथोचित सत्कार केला.

दर्शनानंतर सचिन अहिर यांना श्री तुळजाभवानी मंदिरातील भाविकांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या विविध सुविधा तसेच मंदिर परिसरात सुरू असलेल्या विकासकामांची माहिती देण्यात आली.

यावेळी पुजारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# भूम येथे तेरणा जनसेवा केंद्राचे उद्घाटन

## गरजू रुग्णांना स्थानिक पातळीवर आरोग्यसेवेचा आधार

**भूम : ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना वेळेवर, दर्जेदार आणि सुलभ आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी या उद्देशाने भूम येथे तेरणा जनसेवा केंद्राचे उद्घाटन शनिवारी तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त मल्हार पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.**

तेरणा हॉस्पिटल, नेरुळ (नवी मुंबई) येथे धाराशिव जिल्ह्यातील हजारो गरजू रुग्णांवर अत्याधुनिक आणि पूर्णतः मोफत उपचार करण्यात येतात. या सेवेमुळे अनेक रुग्णांना नवजीवन मिळाले आहे. मात्र, प्राथमिक तपासणी, कागदपत्रांची पूर्तता आणि उपचार प्रक्रियेसाठी धाराशिव येथे वारंवार जावे लागत असल्याने ग्रामीण भागातील रुग्णांची गैरसोय होत होती.

ही अडचण लक्षात घेऊन सुरू करण्यात आलेल्या तेरणा जनसेवा केंद्रात आता रुग्णांना प्राथमिक तपासणी, आवश्यक मार्गदर्शन, कागदपत्रांची पूर्तता तसेच तेरणा हॉस्पिटलशी थेट समन्वयाची सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहे. त्यामुळे रुग्णांचा वेळ, प्रवासाचा खर्च आणि होणारा त्रास मोठ्या प्रमाणात कमी होणार असून गरजूंसाठी हे केंद्र महत्त्वाचे आधारकेंद्र ठरणार आहे.

यावेळी जिल्हा परिषद सभापती विश्वास कोकणे, बाळासाहेब क्षीरसागर, संतोष सुपेकर, महादेव वडेकर, अंगद मुरूमकर, प्रदीप साठे, स्वातीताई तनपुरे, बाबासाहेब वीर, शंकर खामकर, बिभीषण पवार, सिद्धार्थ जाधव, सुदाम पाटील, सुभाष पांढरे, सुहास सानप, ज्ञानेश्वर सानप, सुब्राव शिंदे, अमोल डोबाळे, गणेश भोगील, अशोक महानवर, पवन वणवे, रोहिदास भोसले, सुरेश उपरे, निलेश शेळके, बन्सी काळे, बालाजी भोरे, संजय जगदाळे, हनुमंत शेलार, प्रभाकर डोबाळे, अशोक पाटील, रंजित वारे, सुहास चव्हाण, काकासाहेब चव्हाण यांच्यासह तेरणा जनसेवा केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, कार्यकर्ते आणि भूम परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





तेरणा वृत्तांत

संपादकीय

## वारी : भक्ती, समर्पण आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीचे अखंड चालते विद्यापीठ

आषाढी एकादशी जवळ आली की महाराष्ट्रातील रस्त्यांना एक वेगळेच चैतन्य लाभते. हजारो नव्हे, तर लाखो वारकरी हातात भगवा पताका, गळ्यात तुळशीची माळ, कपाळी गोपीचंदनाचा टिळा आणि मुखी 'ज्ञानोबा–तुकाराम'चा अखंड गजर करत पंढरपूरच्या दिशेने पायी निघतात. हा प्रवास केवळ एका देवाच्या दर्शनासाठी नसतो; तो स्वतःला घडविण्याचा, समाजाशी जोडण्याचा आणि मानवतेचा संदेश देण्याचा प्रवास असतो. वारी म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक जीवनाचा प्राण आहे.

शेकडो वर्षांपासून अखंड सुरू असलेली ही परंपरा जगातील सर्वात मोठ्या शांततामय लोकचळवळींपैकी एक मानली जाते. वारीतील या प्रवासामागे श्रद्धा आहे, विश्वास आहे, समर्पण आहे आणि संतांनी दिलेला समतेचा विचार आहे.

वारीचा इतिहास हा संत परंपरेशी जोडलेला आहे. संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, संत नामदेव, संत एकनाथ, संत चोखामेळा, संत सावता माळी, संत गोरा कुंभार, संत जनाबाई, संत मुक्ताबाई अशा अनेक संतांनी विठ्ठल भक्तीला समाजजागृतीचे माध्यम बनविले. त्यांनी सामान्य माणसाच्या जीवनात देव पाहण्याची शिकवण दिली. 'विठ्ठल हा भक्तांच्या हृदयात आहे' हा विचार त्यांनी अभंगातून जनमानसात रुजवला.

आजही देहूहून संत तुकाराम महाराजांची पालखी आणि आळंदीहून संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी लाखो वारकऱ्यांसह पंढरपूरकडे प्रस्थान करते. त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या विविध भागांतून संतांच्या अनेक पालख्या पंढरीच्या दिशेने निघतात. प्रत्येक पालखीची स्वतःची परंपरा, इतिहास आणि भावविश्व आहे. या पालख्या केवळ संतांच्या पादुकाच वाहत नाहीत, तर शेकडो वर्षांची संस्कृती, विचार आणि मूल्ये पुढील पिढीकडे पोहोचवतात.

वारकरी संप्रदायाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे समता. वारीत कोणी मोठा नाही, कोणी लहान नाही; कोणी श्रीमंत नाही, कोणी गरीब नाही; कोणी उच्च नाही, कोणी नीच नाही. सर्वजण एकाच रांगेत चालतात, एकाच पंगतीत जेवतात आणि एकाच विठ्ठलाच्या नामात रंगून जातात. भारतीय समाजाला समतेचा आणि सामाजिक ऐक्याचा जो धडा अनेकदा कायदे आणि भाषणांतूनही देता आला नाही, तो धडा वारी शेकडो वर्षांपासून कृतीतून देत आहे. वारी म्हणजे शिस्तीचा आदर्श. लाखो लोक एकत्र असतात; तरी गोंधळ नाही, हिंसा नाही, अव्यवस्था नाही. प्रत्येक दिंडीची निश्चित रचना असते. प्रत्येक वारकरी स्वतःहून नियम पाळतो. वेळेचे नियोजन, मुक्काम, भोजन, स्वच्छता, भजन, कीर्तन यांचा सुंदर समन्वय पाहायला मिळतो. कोणत्याही मोठ्या व्यवस्थापन संस्थेने अभ्यास करावा अशी ही लोकव्यवस्था आहे.

पायी चालण्यामागेही मोठा आध्यात्मिक अर्थ आहे. वाहनाने काही तासांत गाठता येणारा पंढरपूरचा प्रवास वारकरी अनेक दिवस चालत पूर्ण करतो. कारण त्याच्यासाठी गंतव्यस्थान जितके महत्त्वाचे आहे, तितकाच महत्त्वाचा प्रवासही आहे. प्रत्येक पाऊल हे अहंकार कमी करण्याचे, संयम वाढविण्याचे आणि मन शुद्ध करण्याचे साधन बनते. पायांना फोड येतात, उन्हाचा त्रास होतो, पावसात भिजावे लागते; पण चेहऱ्यावर समाधान असते. कारण शरीर थकते, पण श्रद्धा थकत नाही.

वारीतील सेवा हा आणखी एक प्रेरणादायी पैलू आहे. मार्गावर अनेक गावांमध्ये वारकऱ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची, अन्नाची, वैद्यकीय मदतीची, निवाऱ्याची व्यवस्था केली जाते. हजारो स्वयंसेवक कोणत्याही अपेक्षेशिवाय सेवा देतात. अनेक कुटुंबे वर्षानुवर्षे वारकऱ्यांची सेवा करण्याची परंपरा जपतात. काही जण मोफत अन्नदान करतात, तर काही औषधोपचार करतात. ही सेवा केवळ दानधर्म नसून 'वारकऱ्यात विठ्ठल आहे' या भावनेतून केली जाते.

वारीत महिलांचा सहभागही अत्यंत महत्त्वाचा आहे. हजारो महिला वारकरी पुरुषांच्या बरोबरीने पायी चालतात. डोक्यावर तुळस, हातात टाळ आणि मुखी विठ्ठलाचे नाम घेऊन त्या वारीची परंपरा अधिक समृद्ध करतात. संत जनाबाई, संत मुक्ताबाई यांसारख्या संतकवींनी स्त्रीशक्तीला दिलेला सन्मान आजही वारीत दिसून येतो.

वारी पर्यावरणाचा संदेशही देते. पायी चालणे, कमी साधनसंपत्तीचा वापर करणे, सामूहिक जीवन जगणे, निसर्गाशी सुसंवाद ठेवणे ही जीवनशैली आजच्या पर्यावरणीय संकटाच्या काळात अधिक महत्त्वाची वाटते. काही वर्षांपासून प्लास्टिकमुक्त वारी, स्वच्छ वारी, वृक्षसंवर्धन असे उपक्रमही राबवले जात आहेत. श्रद्धेसोबत सामाजिक जबाबदारीही निभावण्याचा प्रयत्न यातून दिसून येतो.

आजच्या धावपळीच्या, स्पर्धेच्या आणि तणावाच्या युगात वारी मानसिक आरोग्याचाही संदेश देते. मोबाईल, सोशल मीडिया आणि भौतिक यशाच्या शर्यतीत अडकलेल्या माणसाला वारी काही दिवस स्वतःकडे पाहायला शिकवते. नामस्मरण, भजन, सामूहिक प्रार्थना आणि साधे जीवन यामुळे मनाला शांतता मिळते. त्यामुळे अनेक तरुणही आता वारीकडे आकर्षित होत आहेत. वारीने महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख जगभर पोहोचवली आहे. देश–विदेशातील संशोधक, अभ्यासक आणि पर्यटक या परंपरेचा अभ्यास करण्यासाठी येतात. एवढ्या मोठ्या संख्येने लोक कोणत्याही सक्तीशिवाय, कोणत्याही आर्थिक प्रलोभनाशिवाय एकत्र येतात, ही जगासाठीही अभ्यासाची बाब आहे. वारी ही केवळ धार्मिक घटना नाही; ती सामाजिक व्यवस्थापन, लोकसहभाग, संस्कृती आणि मानवी मूल्यांचा अभ्यासक्रम आहे. अर्थात, काळानुसार काही आव्हानेही समोर आली आहेत. वाढती गर्दी, वाहतूक व्यवस्थापन, आरोग्य सुविधा, स्वच्छता, पर्यावरण संरक्षण आणि वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी अधिक प्रभावी नियोजन आवश्यक आहे. शासन, स्थानिक प्रशासन, स्वयंसेवी संस्था आणि समाज यांनी समन्वयाने काम केल्यास वारी अधिक सुरक्षित आणि सुकर होऊ शकते. परंपरा जपत आधुनिक सुविधांचा समतोल साधणे ही काळाची गरज आहे. आजच्या पिढीने वारीकडे केवळ धार्मिक परंपरा म्हणून न पाहता, ती मूल्यशिक्षणाची शाळा म्हणून पाहण्याची गरज आहे. समता, बंधुता, संयम, सेवा, शिस्त, सहकार्य आणि पर्यावरण संवर्धन यांसारखी जीवनमूल्ये वारी सहज शिकवते. पुस्तकातून वाचलेले तत्त्वज्ञान आणि वारीत अनुभवलेले तत्त्वज्ञान यात मोठा फरक असतो. महाराष्ट्राची वारी ही केवळ धार्मिक परंपरा नसून राज्याच्या सांस्कृतिक अस्मितेचे जिवंत प्रतीक आहे. बदलत्या काळात अनेक परंपरा लुप्त होत असताना वारी आजही तितक्याच उत्साहाने, तितक्याच निष्ठेने आणि तितक्याच शिस्तीने सुरू आहे. ही परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे, तिचे पावित्र्य जपणे आणि तिच्यातील मानवी मूल्ये समाजजीवनात रुजवणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे.

# आषाढी यात्रेसाठी राज्य परिवहन महामंडळाकडून ५ हजार ५०० विशेष बसेस : परिवहन मंत्री

**पंढरपूर : आषाढी यात्रेच्या सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपुरात येत असतात. राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भाविकांचा प्रवास सुरक्षित व सुखकर व्हावा यासाठी राज्य परिवहन महामंडळाकडून यात्राकाळात ५ हजार ५०० विशेष बस सोडण्याचे नियोजन केले असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. आषाढी यात्रा नियोजनासाठी चंद्रभागा बस स्थानक, पंढरपूर येथे एस टी महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते.**



यावेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, पंढरपूरच्या नगराध्यक्षा प्रणिता भालके व एसटीचे सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.

यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, राज्यातील कोणत्याही गावातून ४० किंवा त्यापेक्षा अधिक भाविकांनी एकत्रित मागणी केल्यास त्या गावातून थेट पंढरपूरसाठी विशेष एसटी बस उपलब्ध करून दिली जाणार आहे. या विशेष बस सेवेतही शासनाच्या सर्व प्रवासी सवलती कायम राहणार आहेत. ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना 'अमृत ज्येष्ठ नागरिक योजना' अंतर्गत मोफत प्रवास, तर महिलांना 'महिला सन्मान योजना' अंतर्गत तिकीट दरात ५० टक्के सवलत दिली जाणार आहे. भाविकांनी आपल्या जवळच्या एसटी आगाराशी संपर्क साधून विशेष बसची नोंदणी करावी. तसेच पंढरपूरातील विविध बसस्थानकांवर थांबलेल्या बसेसची अंतर्गत व बाह्य स्वच्छता, निर्जंतुकीकरण करावे, आषाढी यात्रेसाठी विशेष बससेवा' असा दर्शनी फलक लावण्यात यावा, त्याचबरोबर चालक व वाहक यांच्या आरोग्याच्या वैद्यकीय तपासणीची बसस्थानक परिसरात व्यवस्था करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. परतीच्या प्रवासासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेवून मार्गनिहाय स्वतंत्र रांगा तयार करून नियोजनबद्ध पद्धतीने प्रवाशांना बसेसमध्ये प्रवेश देण्यात यावा अशा सूचनाही परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिल्या.

मागील वर्षी आषाढी यात्रेसाठी एसटीने ५ हजार १४५ विशेष बसेस चालवून तब्बल २१ लाख ९५ हजार भाविकांची सुरक्षित ने–आण केली होती. यंदा त्याहून अधिक सुक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. एकादशीच्या दिवशी लाखो भाविक परतीच्या प्रवासाला निघत असल्याने वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी एसटीचे ३६ हून अधिक वाहतूक नियंत्रक आणि सुरक्षा रक्षक नियुक्त करण्यात येणार आहेत. तसेच वारकरी भाविकांसाठी पंढरपूर व परिसरात चंद्रभागा, भीमा (देगाव), विठ्ठल कारखाना आणि पांडुरंग (आयटीआय महाविद्यालय) अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत. या स्थानकांवर पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

वारी कालावधीत रात्रंदिवस सेवा बजावणाऱ्या महामंडळाच्या १३ हजार कर्मचाऱ्यांना यामध्ये चालक, वाहक, यांत्रिक कर्मचारी, पर्यवेक्षक आणि अधिकारी यांच्यासाठी चहा, नाश्ता आणि भोजनाची व्यवस्था मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्वखर्चाने केली आहे.

# उपोषणाचा अर्ज दिल्याच्या कारणावरून हल्ला

## मोटारसायकल, स्टीलची टाकी फोडून नुकसान

**परंडा :** तालुक्यातील लोणी येथे उपोषणाचा अर्ज दिल्याच्या कारणावरून एका व्यक्तीच्या घरावर कोयता, लोखंडी रॉड, दगड, विटा व लोखंडी पाईपच्या साहाय्याने हल्ला करून मालमत्तेचे नुकसान केल्याची घटना घडली. याप्रकरणी परंडा पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी राहुल विठ्ठल शिंदे (वय ३४, रा. लोणी, ता. परंडा) यांच्या तक्रारीवरून सचिन नवनाथ इतापे (रा. लोणी), वैभव गोरख कोडलिंगे (रा. शेंदरी, ता. बार्शी, जि. सोलापूर) तसेच अन्य दोन अनोळखी इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. १० जुलै रोजी पहाटे सुमारे १.१० वाजण्याच्या सुमारास आरोपींनी फिर्यादीच्या घरासमोर येऊन शिवीगाळ केली. त्यानंतर कोयता, लोखंडी रॉड, दगड, विटा व लोखंडी पाईपच्या साहाय्याने घराच्या दरवाज्यावर व पत्र्यावर वार करून नुकसान केले. तसेच घरासमोर उभी असलेली मोटारसायकल व स्टीलची पाण्याची टाकीही लोखंडी रॉडने फोडल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

यावेळी 'तू उपोषणाचा अर्ज का दिलास?' असे म्हणत फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणी परंडा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (इछड) तसेच शस्त्र अधिनियम ातील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.



# शिक्षण सभापती प्रवीण माळी यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

**धाराशिव :** नगर परिषदेचे शिक्षण सभापती प्रवीण माळी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या समाजोपयोगी उपक्रमाचे उद्घाटन मल्हार पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरातून अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळण्यास मदत होणार असून, अशा उपक्रमांमुळे समाजात सामाजिक बांधिलकीची भावना अधिक दृढ होत असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

रक्तदानासारख्या समाजोपयोगी कार्यातून वाढदिवस साजरा करण्याचा उपक्रम प्रेरणादायी असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. शिबिरात मोठ्या संख्येने रक्तदात्यांनी सहभाग नोंदवत उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी नगराध्यक्ष नेहाताई राहुल काकडे, सभापती अभिजित काकडे, सभापती विलास लोंढे, नगरसेवक राहुल काकडे, सिद्धार्थ बनसोडे, बापू पवार, धनंजय पाटील, पृथ्वीराज दंडनाईक, रवी मुंडे, सुशांत सोनवणे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियानांतर्गत तुळजापुरात तालुकास्तरीय प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

**तुळजापूर :** राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियानांतर्गत सन २०२६–२७ साठी 'आमचा गाव, आमचा विकास' (GPDP) हा ग्रामविकास आराखडा अधिक प्रभावी, लोकाभिमुख आणि सर्वसमावेशक पद्धतीने तयार करण्याच्या उद्देशाने पंचायत समिती तुळजापूर येथे तालुकास्तरीय एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेस जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चना राणाजगजितसिंह पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या प्रशिक्षण कार्यशाळेत ग्रामपंचायतींचा विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया, विविध शासकीय विभागांमधील समन्वय, विविध योजनांचे अभिसरण, लोकसहभागातून गुणवत्तापूर्ण नियोजन तसेच ग्रामविकासाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. ग्रामपंचायतींनी स्थानिक गरजांनुसार विकास आराखडा तयार करून गावाच्या सर्वांगीण विकासासाठी नियोजनबद्ध काम करण्यावर यावेळी भर देण्यात आला.

कार्यशाळेस जिल्हा परिषद सभापती सिद्धेश्वर कोरे, पंचायत समिती सभापती विक्रमसिंह देशमुख, उपसभापती मेलगिरीताई, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, प्रशासक, ग्रामपंचायत अधिकारी तसेच तालुकास्तरीय विविध विभागांचे प्रमुख अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळेत सहभागी प्रतिनिधींनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत ग्रामविकासाच्या प्रभावी नियोजनासाठी आवश्यक बाबींची माहिती घेतली.




# तुळजाभवानी मंदिरात दिव्यांग व अतिवृद्ध भाविकांसाठी मोफत डोली व खुर्ची सेवा

**तुळजापूर : श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर येथे दर्शनासाठी चालत जाण्यास अडचण असलेल्या दिव्यांग, ज्येष्ठनागरिक तसेच अतिवृद्ध भाविकांच्या सोयीसाठी मंदिर प्रशासकीय कार्यालय येथून मोफत डोली व खुर्ची सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे.**

दर्शनासाठी पायी चालणे शक्य नसलेल्या किंवा अडचण येणाऱ्या भाविकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा. ही सेवा मंदिर संस्थानामार्फत पूर्णपणे निःशुल्क उपलब्ध असून, आवश्यकतेनुसार भाविकांना योग्य मार्गदर्शन व सहाय्यही करण्यात येत आहे.

या सेवेचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी मंदिर प्रशासकीय कार्यालयाशी अथवा मंदिर कर्मचारी यांच्याशी संपर्क साधावा. तेथून आवश्यकतेनुसार डोली अथवा खुर्चीची व्यवस्था करून संबंधित भाविकांना दर्शनासाठी सहाय्य करण्यात येत आहे.

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर हे प्रत्येक भाविकाला सुरक्षित, सुलभ व सुखकर दर्शनाचा अनुभव मिळावा यासाठी सातत्याने विविध सुविधा उपलब्ध करून देत असून, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक भाविकांनी या मोफत सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.




साप्ताहिक तेरणा वृत्तांत

हे पत्र मालक, प्रकाशक व संपादक मल्हार राणाजगजितसिंह पाटील यांचेकरिता प्रसाद संजय पवार, राजस्व प्रिंटिंग प्रेस, बुधवार पेठ, वडार गल्ली, सोलापूर, जि.सोलापूर ४१३००२ येथे मुद्रित केले व नरसिंह मंदिराजवळ, तेर, धाराशिव, महाराष्ट्र – ४१३५०९ येथे प्रकाशित केले.

# तडीपार आदेश झुगारून बार्शीत वावर; २४ वर्षीय तरुणावर पोलिसांची कारवाई

**बार्शी : सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातून तडीपार करण्यात आलेल्या एका २४ वर्षीय तरुणावर तडीपार आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी बार्शी तालुका पोलिसांनी कारवाई केली आहे. या प्रकरणी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम १४२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.**




बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक दि. ७ जुलै रोजी पेट्रोलिंग करत असताना गोपनीय बातमीदारामार्फत मौजे जामगाव येथील बाळराजे चौक परिसरात तडीपार इसम फिरत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तातडीने घटनास्थळी जाऊन संबंधितास ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान त्याची ओळख तथागत मुकेश मस्के (वय २४, रा. भीमनगर, बार्शी) अशी पटली. पोलिसांनी त्याच्याकडे बार्शी तालुक्यात फिरण्याबाबत विचारणा केली असता तो समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही. पुढील तपासात मा. उपविभागीय दंडाधिकारी, सोलापूर यांनी दिलेल्या सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील तडीपार आदेशाचे त्याने उल्लंघन केल्याचे निष्पन्न झाले.

याप्रकरणी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# बार्शीच्या पाणीप्रश्नावर सरकारची तातडीची हालचाल



**बार्शी :** तालुक्यातील तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर विधानपरिषद आमदार राजेंद्र राऊत यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे बार्शी उपसा सिंचन योजनेतून तातडीने पाणी सोडण्याची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेऊन बार्शी उपसा सिंचन योजनेतून पाणी सोडण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.

सध्या उजनी धरणातील पाणीसाठा ३६ टक्क्यांहून अधिक झाल्याने बार्शी उपसा सिंचन योजनेतून पाणी सोडण्याची प्रक्रिया सुरू करण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे बार्शी शहरासह संपूर्ण तालुक्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

उपसा सिंचन योजनेतून पाणी सोडल्यानंतर गणेश तलाव, राऊत तलाव यांच्यासह तालुक्यातील विविध तलाव भरले जाणार आहेत. त्यामुळे शहर आणि ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागण्यास मदत होणार असून, आगामी काळात पाणीटंचाईची तीव्रता कमी होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

आमदार राजेंद्र राऊत यांनी सांगितले की, बार्शीकरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. त्यानंतर जलसंपदा मंत्र्यांनी तातडीने दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या असून, लवकरच उपसा सिंचन योजनेतून पाणी सोडण्याची प्रक्रिया सुरू होईल. या निर्णयामुळे बार्शी शहरासह संपूर्ण तालुक्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा असून, अनेक दिवसांपासून भेडसावत असलेल्या पाणीटंचाईच्या समस्येवर प्रभावी उपाययोजनांना गती मिळणार असल्याचे बोलले जात आहे.

# आषाढी वारीपूर्वी बार्शी तालुका पोलिस ॲक्शन मोडवर




## एका दिवसात ५३ जणांवर प्रतिबंधक कारवाई



बार्शी : आगामी आषाढी वारी तसेच विविध सण-उत्सव शांततापूर्ण, सुरक्षित आणि निर्विघ्न वातावरणात पार पडावेत, या उद्देशाने बार्शी तालुका पोलिसांनी रेकॉर्डवरील व सराईत गुन्हेगारांविरोधात मोठी प्रतिबंधक कारवाई हाती घेतली आहे. या विशेष मोहिमेत एका दिवसात तब्बल ५३ आरोपींवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली.

सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी व अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली बार्शी तालुका पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे यांनी गुन्हेगारी प्रवृत्तीवर आळा घालण्यासाठी कठोर कारवाईची मोहीम सुरू केली आहे.

आगामी आषाढी वारी आणि सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर रेकॉर्डवरील, 'टू प्लस' तसेच सराईत गुन्हेगारांमध्ये कायद्याबाबतचा धाक निर्माण व्हावा, त्यांच्यात सुधारणा व्हावी आणि त्यांनी पुन्हा गुन्हेगारीकडे वळू नये, या उद्देशाने ही प्रतिबंधक कारवाई करण्यात आली असल्याचे पोलिसांनी सांगितले.

ही कारवाई प्रभारी अधिकारी अक्षय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक कुलदीप सोनटक्के, पोलीस उपनिरीक्षक आबासाहेब शिरगिरे, ग्रेड पोलीस उपनिरीक्षक राजकुमार यावलकर तसेच बीट अंमलदार सदाशिव गवळी, सोमनाथ खांडेकर, अरुण डुकळे, प्रदीप चौधरी, गणेश दळवी आणि बार्शी तालुका पोलीस स्टेशनच्या अधिकारी व अंमलदारांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली. सोलापूर ग्रामीण पोलीस दलाकडून गुन्हेगारांविरुद्ध अशा प्रतिबंधक कारवाया सातत्याने सुरू राहणार असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि गुन्हेगारी प्रवृत्तीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी भविष्यातही कठोर पावले उचलली जाणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

# IMA बार्शीच्या 'स्वास्थ्य संवाद' उपक्रमात हृदयरोग जनजागृतीवर प्रभावी परिसंवाद

बार्शी : इंडियन मेडिकल असोसिएशन (**IMA**) बार्शीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'स्वास्थ्य संवाद' या सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण उपक्रमात हृदयरोग जनजागृती या विषयावर आयोजित **Cardiology Debate** परिसंवाद उत्साहात पार पडला. या परिसंवादात सुप्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. संजय अंधारे यांनी पॅनल कन्सल्टंट म्हणून सहभाग नोंदवत नागरिकांना हृदयविकाराबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

या व्यासपीठावर आदरणीय डॉ. काबरा, डॉ. खामकर आणि डॉ. साखरे यांच्यासोबत हृदयविकाराची कारणे, आधुनिक उपचारपद्धती, प्रतिबंधात्मक उपाय आणि जनजागृतीचे महत्त्व यावर सखोल चर्चा झाली. उपस्थित नागरिकांनीही विविध प्रश्न विचारत परिसंवादात उत्स्फूर्त सहभाग घेतला.यावेळी बोलताना डॉ. संजय अंधारे म्हणाले की, 'हृदयरोगावरील सर्वात मोठा उपचार म्हणजे जनजागृती. योग्य वेळी लक्षणे ओळखून तातडीने उपचार घेतल्यास अनेकांचे जीव वाचू शकतात. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने हृदयविकाराबाबत जागरूक राहणे अत्यंत आवश्यक आहे.'



### हृदयविकाराची प्रमुख लक्षणे ओळखा

छातीच्या मध्यभागी किंवा डाव्या बाजूला तीव्र वेदना किंवा जडपणा जाणवणे, ती वेदना जबडा, मान किंवा डाव्या हाताकडे पसरणे, अचानक घाम येणे, श्वास घेण्यास त्रास होणे ही हार्ट अटॅकची महत्त्वाची लक्षणे असल्याचे त्यांनी सांगितले. अशा वेळी घरगुती उपाय किंवा गॅसची औषधे घेण्यात वेळ घालवू नये. रुग्णाला शांत ठेवून तात्काळ जवळच्या सुसज्ज रुग्णालयात दाखल करणे हेच सर्वात योग्य पाऊल असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### आधुनिक तपासण्यांचे महत्त्व

हृदयविकाराचे अचूक निदान करण्यासाठी **ECG, 2D Echo** आणि **Angiograhy** या तपासण्या अत्यंत उपयुक्त आहेत. या तपासण्यांद्वारे हृदयाची कार्यक्षमता आणि रक्तवाहिन्यांतील अडथळ्यांचे अचूक निदान करता येते.

### निरोगी जीवनशैलीच सर्वोत्तम संरक्षण

हृदयविकार टाळण्यासाठी दररोज किमान ३० ते ४५ मिनिटे चालणे किंवा सायकल चालवणे, हिरव्या पालेभाज्या व ताजी फळे आहारात समाविष्ट करणे, तसेच तेलकट पदार्थ, डालडा, पामतेल आणि जंक फूड टाळणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले.

मानसिक तणाव कमी करण्यासाठी पुरेशी झोप, ध्यान आणि सकारात्मक जीवनशैली महत्त्वाची असून धूम्रपान, तंबाखू आणि इतर व्यसनांपासून दूर राहण्याचा सल्लाही यावेळी देण्यात आला. तसेच, ज्यांना एकदा हार्ट अटॅक आला आहे किंवा ज्यांची स्टेंट अथवा बायपास शस्त्रक्रिया झाली आहे, त्यांनी डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय रक्त पातळ करण्याची औषधे कधीही बंद करू नयेत, असा अत्यंत महत्त्वाचा सल्ला देण्यात आला. परिसंवादात हृदयविकाराबाबत समाजात असलेले अनेक गैरसमज दूर करण्यात आले.

हृदयविकार फक्त वृद्धांनाच होतो हा समज चुकीचा असून, आज बदलती जीवनशैली, तणाव आणि चुकीच्या आहारामुळे २५ ते ३० वर्षांच्या तरुणांमध्येही हार्ट अटॅकचे प्रमाण वाढत असल्याचे सांगण्यात आले. तसेच, एकदा हार्ट अटॅक आला की आयुष्य संपते हा समजही चुकीचा असून, योग्य उपचार, नियमित औषधे, संतुलित आहार आणि व्यायामाच्या मदतीने रुग्ण पुन्हा सामान्य, सक्रिय आणि आनंदी जीवन जगू शकतो, असा विश्वास डॉक्टरांनी व्यक्त केला.

परिसंवादाच्या यशस्वी आयोजनासाठी खचअ बार्शीचे पदाधिकारी, सर्व सहकारी डॉक्टर, उपस्थित मान्यवर तसेच बार्शीतील विविध सामाजिक संस्थांचे डॉ. संजय अंधारे यांनी मनःपूर्वक आभार मानले.

'जागरूक नागरिक, निरोगी समाज आणि सक्षम भारत घडवण्यासाठी हृदयविकाराबाबत जनजागृती हीच काळाची गरज आहे,' असा संदेश या परिसंवादातून देण्यात आला.

# 'व्हॉईस ऑफ मीडिया'ची राष्ट्रीय कार्यकारिणी जाहीर

नवी दिल्ली : देशभरातील पत्रकारांना एकाच व्यासपीठावर संघटित करण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या व्हॉईस ऑफ मीडिया – व्हीओएम आंतरराष्ट्रीय फोरमने २८ सदस्यीय राष्ट्रीय कार्यकारिणीची घोषणा केली आहे. या कार्यकारिणीत देशातील १६ राज्ये आणि २ केंद्रशासित प्रदेशांतील प्रतिनिधींना स्थान देण्यात आले असून, संघटनेच्या राष्ट्रीय विस्ताराला आणि सर्वसमावेशक कार्यपद्धतीला नवी दिशा मिळणार असल्याचे मानले जात आहे.

राष्ट्रीय कार्यकारिणीच्या नेतृत्वाची धुरा अनिल म्हास्के (महाराष्ट्र) यांच्याकडे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून सोपविण्यात आली आहे.

यात प्रादेशिक पातळीवर बन्सीलाल पांचाल (हरियाणा) यांची उत्तर विभाग, पर्वत कुमार मिश्रा (ओडिशा) यांची पूर्व विभाग, कौशिक अधिकारी (त्रिपुरा) यांची ईशान्य विभाग आणि बालाजी ए. (तामिळनाडू) यांची दक्षिण विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

राष्ट्रीय उपाध्यक्षपदी निरंजन शर्मा (मध्य प्रदेश), सुमन गांगुली (पश्चिम बंगाल), श्रीकृष्ण चांडक (महाराष्ट्र) आणि अशोक वानखेडे (दिल्ली) यांची निवड करण्यात आली आहे.

राष्ट्रीय समन्वयक म्हणून अंजली दुबे (उत्तर प्रदेश), रंजना शुक्ला (हरियाणा), हराधन पॉल (त्रिपुरा), दयानंद चौधरी (त्रिपुरा), हरीशेंद्र निषाद (उत्तर प्रदेश), शिबानंद पटनायक (ओडिशा), सुमित तिवारी (उत्तराखंड) आणि ज्योतिंद्र सिंह (मणिपूर) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राष्ट्रीय संघटक म्हणून गिरीश भटेले (मध्य प्रदेश), ओकेनजीत सुंधाम (नागालँड), अमित रॉय (पश्चिम बंगाल), पारुल शर्मा (हिमाचल प्रदेश) आणि हितेश मारू (गुजरात) यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य म्हणून सुनील जोसेफ (केरळ), उत्तम दीक्षित (राजस्थान), स्वप्ना दत्ता (आसाम), अक्षित महाजन (जम्मू-काश्मीर) आणि राजेश दुबे (बिहार) यांचा समावेश करण्यात आला आहे.

या राष्ट्रीय कार्यकारिणीत महाराष्ट्र, तामिळनाडू, हरियाणा, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, त्रिपुरा, ओडिशा, उत्तराखंड, मणिपूर, नागालँड, हिमाचल प्रदेश, गुजरात, केरळ, आसाम, बिहार तसेच केंद्रशासित प्रदेश दिल्ली आणि जम्मू-काश्मीर या भागांतील प्रतिनिधींना स्थान देण्यात आले आहे.

देशभरातील पत्रकारांच्या हक्कांचे संरक्षण, पत्रकार कल्याण, संघटनात्मक विस्तार, प्रशिक्षण, सामाजिक सुरक्षा आणि पत्रकारांच्या विविध प्रश्नांसाठी राष्ट्रीय स्तरावर प्रभावी पाठपुरावा करण्याच्या उद्देशाने ही कार्यकारिणी कार्यरत राहणार असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. विविध भाषा, संस्कृती आणि प्रदेशांचे प्रतिनिधित्व असलेली ही कार्यकारिणी व्हॉईस ऑफ मीडियाच्या राष्ट्रीय वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा मानली जात आहे.

राष्ट्रीय अध्यक्ष अनिल म्हास्के यांनी कार्यकारिणीची घोषणा करताना भावनिक शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले, ङ्गव्हॉईस ऑफ मीडिया ही केवळ एक संघटना नसून देशभरातील पत्रकारांना जोडणारे एक मोठे कुटुंब आहे. आज १६ राज्ये आणि २ केंद्रशासित प्रदेशांतील सहकाऱ्यांना राष्ट्रीय कार्यकारिणीत स्थान मिळाल्याने संघटनेचा राष्ट्रीय विस्तार अधिक भक्कम झाला आहे. प्रत्येक पदाधिकारी पत्रकारांच्या हक्कांसाठी, त्यांच्या सामाजिक सुरक्षिततेसाठी आणि संघटनात्मक बळकटीसाठी समर्पित भावनेने कार्य करेल, असा मला विश्वास आहे. विविध भाषा, संस्कृती आणि प्रदेशांना जोडत देशातील पत्रकारांची एकजूट निर्माण करण्याचे आमचे ध्येय आहे. आगामी काळात व्हॉईस ऑफ मीडिया प्रत्येक राज्यात अधिक सक्षमपणे कार्यरत राहील आणि पत्रकारांच्या प्रश्नांसाठी राष्ट्रीय स्तरावर प्रभावी आवाज बनून उभा राहील.

यावेळी व्हॉईस ऑफ मीडियाचे संस्थापक तथा आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी नव्याने जाहीर झालेल्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे अभिनंदन करत सर्व पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले, ङ्गही कार्यकारिणी देशातील पत्रकारांच्या अपेक्षा पूर्ण करणारे सक्षम नेतृत्व देईल, असा मला पूर्ण विश्वास आहे. संघटनेच्या विचारांशी निष्ठा ठेवून पत्रकार कल्याण, पत्रकारांचे हक्क आणि राष्ट्रीय स्तरावरील संघटनात्मक विस्तारासाठी सर्व पदाधिकारी एकजुटीने कार्य करतील. देशातील प्रत्येक पत्रकारापर्यंत व्हॉईस ऑफ मीडियाचे कार्य पोहोचवून पत्रकार सशक्तीकरणाचा संकल्प अधिक व्यापक करण्यासाठी ही टीम महत्त्वाची भूमिका बजावेल. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना मनःपूर्वक शुभेच्छा.

# तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाचे डॉ. प्रशांत जैन यांना डिझाईन पेटंट प्रदान

धाराशिव : तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील यांत्रिकी विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. प्रशांत ह. जैन यांना त्यांच्या अभिनव संशोधनासाठी भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून डिझाईन पेटंट प्रदान करण्यात आले आहे. 'आयसोमेट्रिक रेखाचित्रांसाठी लंबवतुळ रेखांकन टेम्पलेट' या शोधनिर्मितीसाठी हा पेटंट मिळाला आहे. अभियांत्रिकी शिक्षण व तांत्रिक रेखांकन क्षेत्रासाठी उपयुक्त ठरणाऱ्या या नावीन्यपूर्ण संशोधनामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील कार्याला नवी ओळख मिळाली आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. माने यांच्या हस्ते डॉ. जैन यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. डी. डी. दाते (अधिष्ठाता (शैक्षणिक) व विभागप्रमुख, यांत्रिकी अभियांत्रिकी विभाग), प्रा. ए. झेड. पटेल, प्रा. डी. एच. निंबाळकर, प्रा. ए. बी. भस्मे, प्रा. एस. पी. बिरादार, प्रा. एस. डी. शिंदे तसेच श्री. संजय पवार उपस्थित होते.

डॉ. जैन यांनी विकसित केलेले 'आयसोमेट्रिक रेखाचित्रांसाठी लंबवतुळ रेखांकन टेम्पलेट' हे त्रिमितीय रेखाचित्रांमध्ये लंबवतुळे अचूक, जलद आणि सुलभ पद्धतीने काढण्यासाठी विकसित करण्यात आलेले विशेष ड्रॉइंग टेम्पलेट आहे. या टेम्पलेटमुळे अभियांत्रिकी विद्यार्थी, डिझाईन अभियंते, ड्राफ्ट्समन, वास्तुविशारद तसेच तांत्रिक रेखाटन करणाऱ्या व्यावसायिकांना कमी वेळेत अधिक अचूक रेखाचित्रे तयार करता येणार आहेत. तसेच अभियांत्रिकी ग्राफिक्स विषयाच्या अध्यापनात आणि औद्योगिक डिझाईन क्षेत्रातही या उपकरणाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होणार आहे.

यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. माने म्हणाले, 'भारत सरकारकडून डिझाईन पेटंट प्राप्त होणे ही महाविद्यालयासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. डॉ. जैन यांनी अध्यापनाबरोबरच संशोधन, नवोपक्रम आणि बौद्धिक संपदा निर्मितीमध्ये केलेले योगदान प्रेरणादायी आहे. अशा संशोधनामुळे विद्यार्थ्यांमध्ये नावीन्यपूर्ण विचारसरणी विकसित होऊन संशोधन संस्कृतीला चालना मिळेल.' डॉ. जैन यांच्या या यशामुळे महाविद्यालयातील विद्यार्थी व संशोधकांना नवोपक्रम, संशोधन आणि बौद्धिक संपदा निर्मितीसाठी निश्चितच प्रेरणा मिळेल, असा विश्वास ट्रस्टचे व्यवस्थापन समन्वयक प्रा. गणेश भातलावंडे यांनी व्यक्त केला.



# कळंब कृषी उत्पन्न बाजार समितीत उभारणार अत्याधुनिक शेतकरी भवन

## राज्य शासनाकडून १.५२ कोटींच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता; आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पाठपुराव्याला यश



**कळंब कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेअंतर्गत अत्याधुनिक शेतकरी भवन उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य शासनाने या प्रकल्पासाठी १ कोटी ५२ लाख ४८ हजार ४१८ रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता दिली असून, यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना मुक्काम, बैठका तसेच विविध मूलभूत सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.**



या प्रकल्पासाठी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी पणन मंत्री जयकुमार रावल यांच्याकडे पत्राद्वारे पाठपुरावा केला होता. शेतकऱ्यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कळंब कृषी उत्पन्न बाजार समितीचा प्रस्ताव तातडीने मंजूर करावा, अशी त्यांनी मागणी केली होती. त्यानंतर शासनाने प्रस्तावास मंजुरी देत प्रशासकीय मान्यता जाहीर केली. शासन निर्णयानुसार या प्रकल्पासाठी एकूण खर्चापैकी ७६.२४ लाख रुपयांचे म्हणजेच ५० टक्के अनुदान शासनाकडून दोन टप्प्यांत दिले जाणार आहे. उर्वरित निधी बाजार समितीने स्वनिधी अथवा कर्जाच्या माध्यमातून उभारायचा आहे. मंजूर अंदाजपत्रकात इमारत बांधकाम, गुणवत्ता नियंत्रण, जीएसटी, वीज व्यवस्था, मजूर विमा आदी खर्चांचा समावेश करण्यात आला आहे.

शासनाने या कामासाठी काही अटीही घातल्या आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तांत्रिक मान्यता घेतल्यानंतरच निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार असून, प्रशासकीय मान्यतेच्या दिनांकापासून एका वर्षाच्या आत शेतकरी भवनाचे बांधकाम पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कामाच्या प्रगतीचा अहवाल नियमितपणे संबंधित अधिकाऱ्यांना सादर करावा लागणार आहे. तसेच भवनाची देखभाल, दुरुस्ती, वीज-पाणी व इतर दैनंदिन खर्चाची जबाबदारी बाजार समितीवरच राहणार आहे. या निर्णयामुळे कळंब बाजार समितीत येणाऱ्या शेतकऱ्यांना सुरक्षित निवास, बैठक व्यवस्था आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध होणार असून, कृषी बाजार व्यवस्थेला अधिक बळकटी मिळणार असल्याचा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

# श्री तुळजाभवानी मातेस २८१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र अर्पण

**तुळजापूर :** श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर येथे रविवारी श्री क्षेत्र उमरखेड, जि. यवतमाळ येथील श्री चिन्मय मूर्ती संस्थानचे मठाधिपती परमपूज्य माधवानंद गुरुवामनानंद स्वामी महाराज यांच्या शुभहस्ते श्री तुळजाभवानी मातेस विधिवत अभिषेक, पूजा-अर्चा व ओटी भरण्यात आली.

याप्रसंगी श्री चिन्मय मूर्ती संस्थानचे कुलमुखत्यार ॲड. श्री महेश कनकदंडे व सौ. मोहिनीताई कनकदंडे यांनी भक्तिभावाने श्री तुळजाभवानी मातेस २८१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र अर्पण केले. या पवित्र प्रसंगी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने परमपूज्य स्वामी महाराज यांच्या दर्शनासाठी डोलीची विशेष व्यवस्था करण्यात आली.



दर्शनानंतर संस्थानच्या वतीने स्वामी महाराजांचा तसेच ॲड. महेश कनकदंडे व मोहिनीताई कनकदंडे यांचा श्री देवीजींची प्रतिमा व महावस्त्र देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

# ओबीसी समाजासाठी शासनाच्या १३ महामंडळांचे जिल्हास्तरावर कामकाज सुरू

## विविध कर्ज व व्याज परतावा योजनांसाठी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

**धाराशिव :** इतर मागासवर्गीय समाजाच्या सर्वांगीण सामाजिक व आर्थिक विकासासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ तसेच त्याअंतर्गत कार्यरत १३ उपमहामंडळांची स्थापना केली असून, या महामंडळांचे जिल्हास्तरावरील कामकाज आता धाराशिव येथे सुरू करण्यात आले आहे. विविध कर्ज व आर्थिक सहाय्य योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी करून अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक श्रीमती वृषाली लहारे यांनी केले आहे.

शासनाने विविध समाजघटकांच्या आर्थिक उन्नतीसाठी स्वतंत्र महामंडळांची स्थापना केली आहे. त्यामध्ये जग्ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ (लिंगायत वाणी), संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास म हामंडळ (गुरव समाज), संत सेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळ (न्हावी समाज), लेवा पाटीदार समाज आर्थिक विकास महामंडळ (लेवा समाज), सोळा कुलस्वामिनी आर्थिक विकास महामंडळ (लाडशाखीय वाणी/ वाणी), स्व. विष्णुपंत रामचंद्र दादरे (लोणारी) आर्थिक विकास महामंडळ (लोणारी समाज), संत नामदेव महाराज शिंपी समाज आर्थिक विकास महामंडळ (शिंपी समाज), संत भोजलिंग काका सुतार समाज आर्थिक विकास महामंडळ (सुतार समाज), सरदार वल्लभभाई पटेल गुजर समाज आर्थिक विकास महामंडळ (गुजर समाज), संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ (सोनार समाज), संताजी महाराज आर्थिक विकास महामंडळ (तेली समाज), संत श्री.रुपलाल महाराज आर्थिक विकास महामंडळ (बारी समाज) आणि आगरी समाज आर्थिक विकास महामंडळ (आगरी समाज) यांचा समावेश आहे.

या महामंडळांमार्फत लाभार्थ्यांसाठी सहा योजना पूर्णपणे ऑनलाइन स्वरूपात राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये थेट कर्ज योजना (रु.१ लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज), २० टक्के बीज भांडवल योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना आणि महिला स्वयंसिद्धी व्याज परतावा योजना यांचा समावेश आहे.

या योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र अर्जदारांनी आवश्यक कागदपत्रांसह **www.msobcfdc.org** या वेब पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करणे अनिवार्य आहे. सर्व प्रक्रिया ऑनलाइन असल्याने अर्जदारांनी विहित मुदतीत अर्ज सादर करून शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

या योजनांबाबत अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीजवळ, धाराशिव येथे संपर्क साधता येईल. तसेच अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२४७२-२२३८६३ वर संपर्क साधावा, असे जिल्हा व्यवस्थापक श्रीमती वृषाली लहारे यांनी कळिवले आहे.

# साडे सांगवीच्या रस्ता-पुलासाठी २.९० कोटी रुपयांच्या कामास प्रशासकीय मान्यता

**धाराशिव :** जिल्ह्यातील भूम तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त साडे सांगवी गावाला भेट देऊन ग्रामस्थांना दिलेले आश्वासन अखेर प्रत्यक्षात उतरले आहे. धाराशिवचे पालकमंत्री तथा राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे राज्य शासनाने साडे सांगवी येथील रस्ता व पुलाच्या बांधकामासाठी २ कोटी ९० लक्ष ५८ हजार रुपये खर्चाच्या कामास प्रशासकीय मान्यता दिली आहे. ग्रामविकास विभागाने १० जुलै २०२६ रोजी यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित केला असून, साडे सांगवीच्या विकासाच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

या निर्णयामागे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा निर्णायक ठरला. त्यांनी ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांना पत्र पाठवून साडे सांगवी येथील प्रतिमा-१ ते भोगलगाव साडेसांगवी ते इजिमा -११ या ग्राममार्ग क्रमांक ८० वरील पुलाच्या बांधकामासाठी तातडीने निधी मंजूर करण्याची मागणी केली होती.

या पत्रात त्यांनी नमूद केले होते की, सप्टेंबर २०२५ मधील अतिवृष्टीमुळे साडे सांगवी येथील रस्त्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सप्टेंबर २०२५ रोजी भेट देऊन पुलाच्या बांधकामासाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही सुरू करण्याची सूचना केली. त्यानुसार बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव यांनी २ कोटी ९० लक्ष रुपये खर्चाचा प्रस्ताव ग्रामविकास विभागाकडे सादर केला होता. या प्रस्तावाला तातडीने मंजुरी मि ळावी, अशी विनंतीही पालकमंत्री सरनाईक यांनी संबंधित पत्राद्वारे केली होती.

अखेर त्यांच्या या पाठपुराव्याला यश मिळत शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. यासंदर्भात पालकमंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, 'साडे सांगवी गावाला भेट दिली तेव्हा अतिवृष्टीम ुळे नागरिकांना होत असलेल्या हालअपेष्टा प्रत्यक्ष पाहिल्या. त्यावेळी ग्रामस्थांना रस्ता आणि पुलाचे काम प्राधान्याने करून देण्याचे आश्वासन दिले होते. आज शासनाच्या प्रशासकीय मान्यतेम ुळे ते आश्वासन पूर्ण होत असल्याचा मला आनंद आहे. जनतेला दिलेला शब्द पाळणे हीच आमची कार्यपद्धती आहे.'

श्री.सरनाईक पुढे म्हणाले की, 'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकार ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांना सर्वोच्च प्राधान्य देत आहे. या कामामुळे साडे सांगवीसह परिसरातील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी आणि दैनंदिन प्रवाशांना वर्षभर सुरक्षित व अखंड वाहतुकीची सुविधा उपलब्ध होणार आहे. विशेषतः पावसाळ्यात वाहतुकीसमोरील अडथळे दूर होऊन ग्रामस्थांचा संपर्क अधिक सुरक्षित आणि सुलभ होणार आहे. शासनाने दिलेल्या या मंजुरीबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिलेला शब्द प्रत्यक्ष कृतीत उतरवल्याबद्दल त्यांचे आभार मानले आहेत.

# स्लरी फिल्टर घटकासाठी लाभार्थ्यांची सोडत १४ जुलैला

## अर्जदारांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

धाराशिव : निती आयोगाच्या आकांक्षित जिल्हा कार्यक्रमांतर्गत सन २०२६-२७ मधील विंडो-II (नाविन्यपूर्ण प्रकल्प) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'स्लरी फिल्टर' या घटकासाठी तुळजापूर तालुक्यात प्राप्त झालेल्या लाभार्थ्यांच्या अर्जांची सोडत मंगळवार, दि.१४ जुलै २०२६ रोजी काढण्यात येणार आहे.

ही सोडत तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तुळजापूर येथे सकाळी ११ वाजता पार पडणार आहे. संबंधित घटकासाठी अर्ज केलेल्या लाभार्थ्यांची निवड पारदर्शक पद्धतीने सोडतीद्वारे करण्यात येणार असल्याने अर्जदारांनी वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

या प्रक्रियेमुळे लाभार्थी निवडीमध्ये पारदर्शकता राखली जाणार असून, संबंधित सर्व अर्जदारांनी स्वतः उपस्थित राहून सोडत प्रक्रियेची नोंद घ्यावी, असे तालुका कृषी अधिकारी, तुळजापूर यांनी कळिवले आहे.

# तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीची रेडबेरील टेक सोल्युशन्समध्ये निवड

**धाराशिव : तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संगणक अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थिनी ज्ञानदा योगेश कुलकर्णी हिची पुणे येथील नामांकित आयटी सेवा कंपनी रेडबेरील टेक सोल्युशन्स प्रा. लि. मध्ये युएक्स / युआय डेव्हलपर इंटर्न म्हणून आकर्षक वेतन पॅकेजसह निवड झाली आहे. या यशाबद्दल म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी ज्ञानदा कुलकर्णी तसेच तिचे आई-वडील योगेश कुलकर्णी आणि प्रतिभा कुलकर्णी यांचा म हाविद्यालयाच्या वतीने सत्कार करून अभिनंदन केले.**



ज्ञानदा हिने दहावी व डिप्लोमा या दोन्ही परीक्षा विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण केल्या आहेत. शिक्षणादरम्यान तिने सिम्बॉयसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी येथे जाव्हा डेव्हलपर सर्टिफिकेशन यशस्वीरीत्या पूर्ण केले. तसेच इन्फोसिस च्या 'इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड' या उपक्रमांतर्गत प्रशिक्षण व इंटर्नशिप पूर्ण करून आधुनिक सॉफ्टवेअर विकास, युएक्स/ युआय डिझाइन आणि उद्योगाभिमुख कौशल्यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

ज्ञानदा ही मेहनती, हुशार, कष्टाळू आणि जिद्दी विद्यार्थिनी म्हणून महाविद्यालयात ओळखली जात होती. शैक्षणिक प्रगतीबरोबरच महाविद्यालयातील विविध तांत्रिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि सहशालेय उपक्रमांमध्ये तिचा नेहमीच उत्स्फूर्त सहभाग होता. सातत्यपूर्ण मेहनत, कौशल्यविकास आणि सकारात्मक दृष्टिकोनामुळे तिला ही नामांकित कंपनीत संधी मिळाली आहे.

रेडबेरील टेक सोल्युशन्स प्रा. लि. ही पुणे (हडपसर-मगरपट्टा) येथील एक अग्रगण्य आयटी सेवा कंपनी असून सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, क्लाउड सोल्युशन्स, डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन, डेटा इंजिनिअरिंग आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित विविध सेवा पुरविते.

# समान नागरी कायद्याच्या मसुद्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती गठीत

मुंबई : राज्यात समान नागरी कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापन करण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भारताच्या संविधानातील राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रत्येक राज्याने समान नागरी कायद्याचा विचार करावा, असे निर्देश आहेत. त्यानुसार २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात समान नागरी कायद्याच्या अंम लबजावणीसाठी समिती स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली होती. त्या अनुषंगाने राज्य शासनामार्फत या समितीची स्थापना करण्यात येत आहे.

समितीमध्ये न्यायमूर्ती रंजना देसाई (माजी न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालय), न्यायमूर्ती आर. सी. चव्हाण (माजी न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय), न्यायमूर्ती एस. जी. मेहरे (माजी न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय), डी. के. जैन (माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य), ॲड. वीरेंद्र सराफ (माजी महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य), रमेश पतंगे (पद्मश्री व संविधान अभ्यासक) आणि सुवर्णा रावल (शिक्षणतज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्त्या) यांचा समावेश आहे.

ही समिती पुढील सहा महिन्यांत आपला अहवाल राज्य शासनाला सादर करेल. या अहवालाच्या आधारे येत्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात समान नागरी कायद्याचे विधेयक विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्याचा शासनाचा प्रयत्न राहील.